1

ISBN : 978-81-939613-2-2



# अण्णा भाऊ साठे : समतावादी साहित्यीक

संपादक
डॉ. दिपक सुर्यवंशी
डॉ. सदाशिव भुयारे
अनुप्रिता मोरे

Scanned with OKEN Scanner

## अण्णा भाऊ साठे: समतावादी साहित्यीक


1) डॉ. दिपक सुर्यवंशी

2) डॉ. सदाशिव भुयारे

3) अनुप्रिता मोरे


1) डॉ.दिपक सुर्यवंशी : शिक्षणमहर्शी ज्ञानदेव माहेकर महाविद्यालय कळंब मराठी विभागात सहा. प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.पदवी पदव्युत्तर स्तरावर एकूण 12 वर्षे अध्यापणाचा त्यांचा अनुभव आहे.सामाजिक तथा शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी उल्लेखनिय कार्य केलेले आहेत.विद्याभुषण पुरस्कार, महात्मा फुले शिक्षकरत्न पुरस्कार, लोकमंगल मल्टिस्टेटचा शिक्षकरत्न पुरस्कार तथा एकता फाउडेंशन उस्मानाबादचा आदर्श शिक्षक पुरस्कार अशा एकून 7 पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आलेले आहे.

2) डॉ. सदाशिव भुयारे :

प्रा.सदाशिव राजाराम भुयारे यांनी यशवंत महाविद्यालय, नांदेड येथे पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागात १३ वर्षे अध्यापनाचे कार्य केले आहे.सध्या ते शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर येथे अर्थशास्त्र विभागप्रमख तथा प्रभारी वाणिज्य विभाग म्हणून कार्यरत आहेत.त्यांनी अर्थशास्त्र अंर्तविद्याशाखीय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर १० शोधनिबंध प्रकाशित केले आहेत.याशिवाय राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर ११ शोधनिबंधाचे वाचन केले आहे. त्यांना पंचायत राज संस्था व ग्रामीण विकास या प्रबंधासाठी यु.जी.सी.ची राष्ट्रीय फेलोशिप प्राप्त झाली आहे.याशिवाय पुरोगामी महामानवांच्या विचारांवर भाषणाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य सक्रियपणे पार पाडीत आहेत. सद्यस्थितीत सामाजिक व राजकीय चळवळीत सक्रिय असून भारतीय कम्युनिस्ट पार्टी (युनायटेड) राष्ट्रीय जनरल सेक्रेटरी म्हणून कार्य

3) सौ. अनुप्रिता मोरे : वनस्पतीशास्त्र विषयाच्यास अभ्यासका असून त्यांची संदिप युनिर्व्हसिटी नाशिक येथे वनस्पतीशास्त्र विषयाच्या संशोधक विद्यार्थीनी म्हणून त्या कार्यरत आहेत. अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांचा जागर व्हावा या उद्देशाने त्यांनी दोन अंतराष्ट्रीय चर्चा सत्राचे आयोजन केले आहे.तसेच त्यांच्या नावावर एक संपादित ग्रंथ आहे.सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करतांना त्या दिसून येतात.


ISBN : 978-81-939613-2-2

Publisher
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 7020796909

Publisher
Shaurya Publication

www.publishjournal.co.in


Scanned with OKEN Scanner

**DECLARATION BY THE PUBLISHER**

## ISBN : 978-81-9396-2-2

संपादक

डॉ. दिपक सुर्यवंशी
डॉ. सदाशिव भुयारे
अनुप्रिता मोरे

**Publication**
Shaurya Publication
Khadgao Road, Kapil Nagar, Latur-413512
Email-hitechresearch11@gmail.com

**Printing**
Shaurya Offset, MIDC, Latur

**First Edtion–14**th Dec. 2019

**Note :-**Views, idea and materials published in this ISBN Book are intellectual properties of author (s). Author(s) is/ are solely responsible for their publication and not the Editors, Principal or publisher.

© All right are reserved. No part of this publication may be reproduced, stored, retrieved or transmitted in any form, by any means, without the written permission from **Dr. Deepak Surwanshi, Dr. Sadashiv Bhuyare, Anuprita More**





## दोन शब्द... :

लोकशाहीर, कवी, नाटककार, कथाकार, कादंबरीकार, संयुक्त महराष्ट्र निर्मीतीच्या लढयाचे लोकनायक, वैश्विक तत्वज्ञ, समाजशास्त्रज्ञ, व साहित्य रत्न अशा नावांनी अण्णा भाऊ साठे हे जागतिक स्तरावर प्रख्यात आहेत. अण्णा हे अक्षर साहित्याचे उदगाते व विद्रोही मुल्यांचे सर्जक आहेत.त्यांची लेखनी ही सत्याशी व मुल्याशी इमान राखनारी आहे.शोषण व अन्याय सहनकरीत घाम गाळणाऱ्या व कष्ट करणाऱ्या मानसांच्या डोळयातील आश्रुंची भाषा अण्णाना समजली होती.
विद्रोह, आक्रोश, बंड, चीड, जातियता, नकार, विरोध, उठाव व संताप यासारख्या समग्र परिवर्तनाच्या शासवत मुल्यांची त्यांनी पेरणी करून समाजाला दास्यमुक्ती व जीवनमुक्तीचा मार्ग दाखवित निर्भयपणाने वैचारीक बंड उभारले. अण्णांच्या साहित्यातून विषमतावादी साहित्यातील विद्रुपता आणि क्रुरतेचे दर्शन होते.अण्णाच्या सहित्यात समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुत्वावाचे मानवतावादी तत्वज्ञान आहे.स्त्रीत्वाचा आत्मसन्मान व प्रतिष्ठेचा आहे.विज्ञान धिष्ठतेचा आग्रह आहे.माणूसपण नाकारणाऱ्या अमानवीय व्यवस्थेविरूध्दचा यल्लगार आहे.हा देश, या देशाची जनता सुखी व्हावी व या देशाचे नंदनवण व्हावे अशी अण्णांची क्रांतीकारी स्वप्ने आहेत.माणूस हाच खऱ्या अर्थाने जगातील प्रत्येक क्रांतीचा उद्‌गाता असल्याचे अण्णांचे स्पष्ट मत होते.मरत मरत जगणारी माणसं ही खऱ्या अर्थाने जगतच नसतात तर या उलट लढून मरणारी मानसं ही मरूनही जिवंत रहातात हे मुख्य जिवनसुत्र अण्णांच्या साहित्यात आहे.विशेष म्हणजे अण्णांचे समग्र साहित्य निर्मीतीच्या गुणवत्तेचे मानदंड आहे.

विश्वसाहित्य रत्न आण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमीत्ताने त्यांना विनंम्र अभिवादन व या एकदिवशीय अंतरविद्याशाखीय परिषदेचे आयोजक प्रा.डॉ.रमेश लाडंगे यांचे हर्दिक अभिनंदन. या निमित्ताने प्रकाशित होणारे हे पुस्तक संशोधक विद्यार्थी तथा शैक्षणिकक्षेत्रात मैलाचा दगड ठरेल ही अपेक्षा...!

प्रा.डॉ. माधव बसवंते
नांदेड

# साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या चिंतनातील मानवतावादी दृष्टीकोन

प्रा. डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी
मराठी विभाग, शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

---

**प्रास्ताविक :**

प्रचंड गरीबी अन् दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या कुटूंबात सांगली जिल्ह्यातील वारणा नदीच्या खोऱ्यातील वाटेगाव या खेड्यात मांग जातीत १ ऑगस्ट १९२० रोजी अण्णाभाऊ साठे यांचा जन्म झाला. वयाच्या दहाव्या वर्षी दीड दिवस शाळेत जाऊन शाळा सोडून दिली. बालपणी कोळसा, हमाल, घरगडी, हेलकरी अशा प्रकारची अनेक कामे केली. मावसभावाबरोबर कपड्याचे गाठोडे घेऊन मुंबईत अनवाणी फिरून मुंबईतल्या पाट्या वाचून अण्णाभाऊ साक्षर झाले आणि खऱ्या अर्थाने ते साहित्यातून अनुभवाचे विद्यापीठ झाले. त्याचवेळी आईला त्यांनी शब्द दिला, "आई मी जगाच्या शाळेत शिकेन, मोठा होऊन तुझे नाव उज्ज्वल करेल." अन् तो खरा ठरवला. गिरणी कामगार झाले. कष्टप्रद जीवन जगताना आलेले कटू अनुभव लिखाणाद्वारे समाजासमोर मांडले. कादंबरीकार, कथाकार, नाटककार, शाहीर व लोकनाट्य लेखन करून कलापथकाच्या माध्यमातून लोकजागृती अखंडपणे केली. त्यातूनच ते साहित्यसम्राट आपले अनुभव मांडताना ते म्हणत, "मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही, त्या बाबतीत मी स्वतःला बेडूक समजतो." त्यांच्या लेखनाचे दीन-दलित, उपेक्षित व वंचित समाजातील लोक त्यांचे सुख-दुःख केंद्र राहिले. वास्तव जीवनानुभव, कथा-वेदना, इर्षा, जिद्द आणि कष्टकऱ्यांचा संघर्ष त्यातून अभिव्यक्त केला आहे. साहित्य समाजपरिवर्तनाचे माध्यम असून सामाजिक बांधिलकीसाठी साहित्यिक लेखन करत असतात. साहित्यात जीवनाचे अनुभव मांडणारे ते जातिवंत साहित्यिक ठरतात. त्यांनी तत्वज्ञान अथवा अंधःश्रद्धा निर्मूलनाविषयीच्या प्रेरणा कोणत्याही ग्रंथातून घेतल्या नाहीत. आपल्या लेखणीद्वारे वास्तवाला भिडणारे विचार परखडपणे व्यक्त केले.

अण्णा भाऊ साठे यांनी १९ कथासंग्रह, ३७ कादंबऱ्या, २ नाटके, शेकडो गाणी, १० लोकनाट्य, २ शाहिरी वाङ्मय व ७ चित्रपट कथा लिहिल्या आहेत. यातून उपेक्षितांच्या अंतरंगाचे पैलू विशद केले आहेत. त्यांनी एक अजरामर प्रेरणादायी गीत लिहिले,

जग बदल घालूनी घाव । सांगून गेले मला भीमराव ।।
गुलामगिरीच्या या चिखलात । रूतून बसला कोसवत ।।

बाबासाहेबांच्या विचारावर त्यांची असीम निष्ठा होती. त्यातून त्यांनी "हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलितांच्या / कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे." अशा प्रकारचे तत्वज्ञान सांगितले. तत्कालिन सामाजिक परिस्थितीत अण्णाभाऊंचे साहित्य रूपवादी, रंजनपर व परधार्जिन





आणि भडक आहे. ते साहित्य बाह्य प्रेरणेवर आधारलेले आहे अशी टीका झाली. मराठी कादंबरीचे शतक लिहिणाऱ्या कुसुमावती देशपांडे यांनी तर कोण हे अण्णा भाऊ साठे? असा प्रश्नच केला होता. दिवसभर कामानिमित्त फिरताना मुंबई मायानगरीचे चित्रण करत ते लिहितात,

मुंबईत उंचावरी । मलबार हिल इंद्रपुरी ।
कुबेराची वस्ती तिथ सुख भोगती ।।
परळात राहणारे । रात दिन राबणारे ।
मिळेल ते खाऊन घाम गाळती ।।

खऱ्या अर्थाने मुंबईनगरी ही गर्भश्रीमंताची असल्याचे साहित्यिकांनी नोंदविले पण भाऊंना तीचा विषमव्यवस्थेची प्रतीक वाटते. वाटेगावच्या परिसरातील निसर्गसौंदर्य, तुडुंब भरलेल्या नद्या, ग्रामदेवतांच्या यात्रा-खेत्रात उत्सवी वातावरणात बालपण गेले. जत्रेत मर्दांनी दांडपट्टे, मर्दांनी खेळ वाजविण्यापासून, आख्यायिका, ओव्यांचा त्यांच्या मनावर अमीट ठसा उमटला. पातिव्रत्याचे पालन करणाऱ्या स्त्रिया अवतीभोवती होत्या, त्याच निष्ठावान स्त्रियांचे होणारे शोषण तसेच झोपडपट्टीतील उघडे-वाघडे जगणे, उपाशी पोटी राहणे, त्यातून प्रचंड निर्माण होणारी वेदना, चीड, भूकेची शमवणूक करण्यासाठी केलेला अवैध मार्गाचा स्वीकार या भयानक अनुभवांचे शिक्षण त्यांना पावलोपावली मिळाले, अनुभवाचे शिक्षण हेच खरे शिक्षण याची खात्री त्यांना पटली.

**स्मशानातील सोन :**

ही कथा भीमाच्या कष्टकरी जीवनाचे चित्रण करते. गावात काम नसल्याने तो मुंबईला जातो, खाणीत कष्टाचे काम करतो मात्र खाण बंद पडल्याने उपाशी असणारा भीमा स्मशानातून सोनं शोधण्याचे काम सुरू करतो. एका रात्रीत भीमा पुरलेलं प्रेत उकरताना कोल्हा-लांडग्यांच्या हिंस्र प्राण्यांमध्ये झुंड होते. त्याच झटापटीत प्रेताच्या जबड्यात भीमाचा हात अडकून त्याच्या हाताची बोटे तुटतात, त्याचवेळी खाणीचे बंद पडलेले काम सुरू होते. पण भीमाच्या हाताला काम करण्यासाठी मात्र बोटे नसतात. अत्यंत भयानक असलेल्या दारिद्र्याचे वास्तव कथेत भाऊंनी रेखाटले आहे. त्यांनी लेखनामागील भूमिका मांडताना ते म्हणतात, "माझी जीवनावर फार निष्ठा असून मला माणसे फार आवडतात, त्यांची श्रमशक्ती फार महान आहे. त्यांच्या बळावरच हे जग चालतं. त्यांची झुंज व त्यांच यश यावर माझा विश्वास आहे."

सण-उत्सव, जत्राखेत्रा, बैलगाड्यांच्या शर्यती, कुस्त्यांचे फड, तमाशे, जागरण, गोंधळ, वाघ्या-मुरळी, अंधःश्रद्धा, शेतकरी, शेतमजूर, एकमेकांचे सहकार्य, शेतीव्यवस्थेत होणारा बदल, पिठाच्या गिरण्या, विहिरीवरील इंजिन, आधुनिकतेपुढे कोसळणारा गावगाडा, नातेसंबंध, श्रेष्ठ कनिष्ठतेचा भाव, बलुतेदाराची स्थिती गती, सावकारशाही, श्रीमंत-गरीब यातील दरी, श्रीमंत महिलांची प्रतिष्ठेसाठी होणारी घुसमट, देशाच्या स्वातंत्र्याची आच, स्त्रियांचे शील, महारवाडा, मांगवाडा,



158

ISBN : 978-81-939613-2-2

वेशीवरील घडामोडी अशा अनेक गोष्टींचे यथार्थ वर्णन साहित्यातून त्यांनी केले आहे. त्यांच्या साहित्याची ग्रामीण भागाशी जोडलेली नाळ स्पष्ट दिसून येते. परिसराच्या वास्तवाची मांडणी केल्याने त्यांची साहित्याची सीमा वैश्विकतेशी जोडली गेली आहे. यामुळे त्यांचे साहित्य भारतीय भाषांसोबतच जर्मन, झेक, इंग्लिश, पोलिश, रशियन, स्लोव्हाक आदि भाषांतही ते भाषांतरित झाले आहे.

मुंबईतील कामगारांचे जीवन, त्यांचे वर्गसंघर्ष, संप, तत्वज्ञान, मोर्चे, रोजीरोटीचा सवाल, कामगार चळवळीतील मतभेद या बाबतीत त्यांनी श्रीपाद अमृत डांगे यांच्या सहवासामुळे मार्क्सवादी भूमिकेतून लेखन केले आहे. तमाशाला शासनाच्या बंदीतून बाहेर काढण्यासाठी 'लोकनाट्य' ही संज्ञा वापरली आहे. शेटजीचे इलेक्शन, देशभक्त घोटाळे, माझी मुंबई, खापऱ्या चोर अशा कांही रूढ शब्दांतून लोकांसमोर वास्तव मांडले. समाजात खऱ्या अर्थाने समता प्रस्थापित करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. अण्णाभाऊंचे व्यक्तिमत्त्व तरल, संवेदनशील, महत्त्वाकांक्षी, जिद्दी व हरहुन्नरी होते. अण्णाभाऊंच्या साहित्यात पुरूषप्रधान नायकाप्रमाणेच स्त्री नायिकासुद्धा प्रभावीपणे उभ्या केल्या आहेत. सामाजिक बांधिलकीचे तत्त्व त्यांच्या साहित्यातून दिसते.

**माकडीचा माळ :**

रंगराव पाटील माकडवाल्याच्या दुर्गाला अडवून म्हणतो, "तुझ्यासारखी देखणी पोरगी माझ्या खोऱ्यातून सहसा सहसलामत सुटत नाही." याला प्रत्युत्तर देताना भडकून दुर्गा म्हणते, "मी गरीबाची लेक पडले, न्हाय तर मी तुला ठारचं मारलं असत." या संवादावरून स्त्रियांना दुर्बल न बनवता सक्षम बनविणे हे अण्णाभाऊंनी निर्धारित केले होते.

**कुरूप :**

अण्णाभाऊंच्या कथेतील स्त्रिया गरीब, दैन्य-दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या आहेत. प्रसंगी कुलशील जपून विराट अवतार धारण करणाऱ्या, जबाबदारीने वर्तन करणाऱ्या आहेत. 'हरणा' धनाच्या धुंदीत उन्मत्त झालेला बाबा पाटील कलंकीत करू पाहतो. तेंव्हा हरणा तिचा नवरा मेल्यावर आपल्या अब्रुची धिंडवडे काढू पाहणाऱ्या बाबा पाटलाला ठार मारते.

**चिखलातील कमळ :**

यातील नायिका सुलक्षणी, कुलवंत, नैतिक व सुसंस्कारित आचरण करणारी आहेत. ती निरक्षर असूनही सुसंस्कृत आहेत. सीता खंडोबाला सोडलेली मुरळी. नाचताना सुद्धा पैशापेक्षा आपल्या शिलाला अधिक महत्त्व देते. कथेतील महादू पाटलाला बजावून सांगते, "पन्नास रूपड्यासाठी शरीराची रूमान का करू? मला त्रास देण हाच तुमचा हेतू असेल तर हे रूपये घेऊन चालते व्हा?"



**मीरा :**

मराठी प्रचलित साहित्यक्षेत्रात ही स्त्री प्रथम ठरते ती स्त्रीत्व मनात जपून न्याय व हक्कासाठी धडपडणारी आहे. समाजात ती पवित्र व सन्मानपूर्वक जीवन जगू पाहते. मीरा ही तिच्या पतीपेक्षा दिसायला खूपच सुंदर, रेखीव आहे. तिचे डोळे मादक-मोहक आहेत. यावरूनच सासू व नणंद तिचा वेळोवेळी द्वेष करतात, ती वाईट वागते असे खोटे तिच्या नवऱ्याला सांगतात. त्यामुळे तिचा नवरा तिचा छळ करतो तर दीर तिचे रूप व डोळे पाहण्यासाठी तडफडतो.

**सुलतान :**

अण्णाभाऊंच्या कथेतील प्रत्येक नायक वैफल्यग्रस्त नसून ते शूर, विजयी, स्वावलंबी, धाडसी व जगण्यासाठी नेहमी संघर्ष करणारा आहे. सुलतान बेरोजगार असून काम करण्यासाठी धडपडतो. परंतु त्याला काम मिळत नाही. आपण एखाद्या हॉटेलात काम करू, कारण या देशात गोर-गरीबांना कधीही न मिळणारे गोड पदार्थ किंवा त्याचा भूसा तरी आपल्याला खायला मिळेल, किमान खाली सांडलेले तरी खायला मिळेल ही त्याची इच्छा, पण ती कधीही पूर्ण होत नाही. शेवटी कंटाळून आत्महत्या त्याला करावी वाटते. परंतु त्याचा प्रयत्न अयशस्वी होतो. नंतर तो ठरवतो मी पोटासाठी मरणार नाही, पोटासाठी लढेन, शेवटी तो तुरूंगात तो लढतो आणि दोन भाकरी जास्त मिळवतो. दुष्काळात गरीबांना अन्न मिळत नाही, तो म्हणतो कुत्र्यासारखं जगू नका, अन्यायाचा प्रतिकार करा. मनगटावर भरोसा ठेवा. या संदेशाने गरीब माणसं पोटासाठी धडपडतात. त्याला पाहिजे ते लुटूण आणतात, दुष्काळात जगतात, मात्र त्याचवेळी उच्च समाजातील लोक त्यांच्यावर दरोडेखोर असा शिक्का मारतात. परंतु अशा लोकांची परिस्थिती ओळखायला पाहिजे, असे भाऊ सांगतात.

त्यांच्या साहित्यातून प्रचंड नीतीमत्ता आलेली आहे. एका दारूवर आधारित कथेतील दोन माणसं खूप दारू पितात. ते एकमेकांचे मेहुणे असतात. रात्रीच्या वेळी नशेत स्वतःच्या घरात न जाता एकमेकांच्या घरात जातात, परंतु दुसऱ्या दिवशी सकाळी जवळच्या तलावात चार प्रेत तरंगताना दिसतात. यावरून त्यांची पात्रे कमालीची नीतीमत्ता असल्याचे दिसून येते. अण्णाभाऊ हे खऱ्या अर्थाने प्रचंड आशावादी, अनुभवाची वास्तवतेला जोड देणारे चिंतनशील होते. त्यांनी आपल्या साहित्यामधून आशावादी भूमिका विशद केली. कष्टकरी, मजूर यांचा संघर्ष व त्यातून त्यांना मिळालेले यश भाऊंनी अधोरेखित केले.

**फकीरा :** नायक हा इंग्रजी सत्तेच्या काळात मांग-महारांना तीन वेळा हजेरी द्यावी लागायची. ही हजेरी फकीरावरही लादली होती. तेंव्हा फकीरा यास साफ नकार देतो. म्हणतो, "मी तीन वेळा हजरी का द्यायची? ही गुलामी का? मी गुलाम नाही, मी तीन वेळा हजरी देणार नाही." बाबासाहेबांनी म्हटले होते की, "गुलामाला गुलामीची जाणीव करून दिल्याशिवाय बंड करून उठत



151

Scanned with OKEN Scanner

नाही." त्या विचाराप्रमाणे कादंबरीतील नायक बंड करून उठतो तो आपले कतृत्व सिद्ध करताना दिसतो. बेडस गावचा खजिना लुटायला गेल्यानंतर रघुवामनाच्या वाड्यातील स्त्रियांच्या अंगाला बोटही न लावता त्यांचा आदर करणारा फकीरा.

**वैजयंता :**

कादंबरीच्या प्रस्तावनेत मी जनतेची कदर करणारा कलावंत आहे. माझा माझ्या देशावर व जनतेवर तिच्या संघर्षावर प्रचंड विश्वास आहे. देश सुखी समृद्ध व्हावा, इथे समता नांदावी, अशी स्वप्ने मला रोज पडतात, ती पाहत पाहत लिहितो. सत्य हदयाने लिहावे लागते. दलितांचे जीवन तितक्याच प्रामाणिक व निष्ठेने चित्रित करणार आहे अशी भूमिका विशद केली.

**वैर :**

यात जुन्या चालीरीती दूर करण्यात लोप पावलेल्या प्रगत प्रथांना पुढे आणावे, महाराष्ट्रात नवसमाजनिर्मिती व्हावी, प्रेम सलोखा नांदावा, जनता सुखी व्हावी, सर्वत्र समाजवादाची संकल्पना पहावयास मिळावी.

**आवडी :**

प्रस्तुत कादंबरी वास्तवावर आधारित असून सातारा परिसरात शिवाजी महाविद्यालयात आपल्या साहित्याची प्रेरणा विशद करताना त्यामागील कथानक उलगडून दाखविले होते. गाठी मारणे व सोडणे हा माझा परंपरागत धंदा नाही, मी पुरोहित नाही, आम्ही आपलं काम फडक्यांकडे सोपवून दिले आहे. मी जन्माने मांग असून माझ्याकडे वास्तव जीवनानुभवाच्या कथा, व्यथांचा वेदना, इर्षा, संघर्ष, दलित कष्टकऱ्यांचा जीवन संघर्ष यांचा भरपूर साठा आहे.
या छळाच्या आगीत ती उभी राहते. तरीपण ती आत्महत्या न करता स्वतःचे डोळे फोडून घेते आणि सर्व स्त्रियांना ती नैतिकतेची शिकवण देते.

**वैजयंता :**

स्त्री ही उपभोगाची वस्तू किंवा सौंदर्याची वस्तू व पुरूषांची गुलाम नाही, तर ती अप्रतिम बाणेदार, करारी, शूर व नीतीमान आहे. वैजयंता एक तमासगीर कलावंत, पैसा-प्रतिष्ठा-प्रसिद्धी अमाप. खुंदलापूर यात्रेत दोन तमाशाची जुगलबंदी लावण्यासाठी आबा पाटील, उमाचंद्र व वैजू परसू असे दोन तमासे फड बोलवतो. याच प्रसंगी एक वैजयंतावर एकतर्फी प्रेम करणारा चंदूलाल वैजयंताचे नाक कापण्याची प्रतिज्ञा करून तेथे येतो. आबा पाटलाच्या वाड्यातच वैजयंताला गाठून तिचे नाक कापून बलात्कार करून तिच्यावर अत्याचार करण्याच्या उद्देशाने तिच्यावर चाल करतो. त्याचवेळी वैजयंता त्याला उग्र रूपाने प्रत्युत्तर देते. हे सर्व चित्र पाहून तेथे असलेला चंदूलाल तिला स्पर्श न करताच निघून जातो. या कादंबरीत तमासगीरावरील संकटे, त्यांचे एकूण जीवनमान व येणारी अनेक संकटे याचे दर्शन प्रकर्षाने घडविले आहे. प्रस्तावनेत जो कलावंत जनतेची कदर करीत असतो, ती जनता त्या कलावंताची कदर करते.





**पिराजीची भानगड :**

अण्णाभाऊंच सुंदर जग निर्माण करण्याच्या स्वप्नावर आधारित कथानक, ते आपल्या पत्राद्वारे पटवून घेतात. पण संपूर्ण जगभराच्या वृत्तपत्रातील पहिले पान बातम्या, दंगल, संप, आंदोलने, मोर्चा, खुन, खराबा, चोरी, फाशी, आत्महत्या, बलात्कार, शिरजोरी अशा अनेक बातम्या सतत येतात. सामान्य माणूस भेदरलेल्या अवस्थेत जीव मुठीत घेऊन जगत आहे. जीवनावश्यक वस्तूच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. गरीब श्रीमंतीची दरी वाढतच चालली आहे. दोनवेळा हाता-तोंडाची भेट होण्यासाठी उघडी-नागडी पोरं उकीरड्यावर कागद वेचत आहेत. दुर्गंधी शेजारी बसून कसलेतरी अन्न खाताना दिसतात. तात्पुरत्या प्लास्टीकच्या निवाऱ्याखाली नवजात बालकाला मायेने स्तनपान करणारी आई, पोटाच्या खळगीसाठी आपली अब्रु विकणारी अबला, जीवाच्या आकांताने औषध मिळत नसल्याने विव्हळणारे अनेक लोक? ही लोक जगत तरी कशी व का? अशा अनेक प्रश्नांची काहूर मनात निर्माण होतात. यावरच अण्णाभाऊंनी कितीतरी वर्षांपूर्वी चिंतन केल आहे. एकीकडे २४ तास एसी मध्ये राहणारी माणसं पिझ्झा, बर्गर खाणारी प्रचंड गर्भश्रीमंत असणारी तर दुसरीकडे जगण्यासाठी संघर्ष करणारी माणसं यावर चिंतन केले आहे.

अण्णा भाऊ साठे नंतरच्या काळात ते एकाकी पडले, सतत लिहित राहिले. उपवास काढत राहिले, अर्धपोटी दिवस काढत होते. आपल्या सोबत असलेल्या विविध संबंधाने एकत्रित जमलेल्या भूतावळीने त्यांना अक्षरशः नागविले. दरम्यानच्या काळात भाऊंची प्रकृती खुप बिघडली व सर्व लोक दुरावली गेली. शासनाने ३५० रूपये मासिक मानधन दिले. समाजकल्याणकडून मिळालेला फ्लॅट दिला. अण्णा भाऊ साठे यांचे जगण व वागणं यात अंतर नव्हते. या संदर्भात एक आठवण कै. श्रीकृष्ण पोवळे यांनी सांगितली, ती अशी, "अण्णाभाऊंनी आपली प्रसिद्ध कादंबरी केवळ दोनशे रूपयांना विकली. त्यापैकी शंभर रूपये रोख मिळाले. त्यातील २५ रूपये त्याचवेळी त्या दोघांच्या जेवणासाठी खर्च केले." दोन दिवस शाळेत गेलेल्या अण्णाभाऊंनी मॅक्झिम गॉर्की वाचून त्याला आपले प्रोत्साहन मानले. मानवी जीवनाच्या सर्व अंगानी विचार करणाऱ्या, सातत्याने जीवनाविषयी सकारात्मक भूमिका विशद करणाऱ्या साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे रविवार १८ जुलै १९६९ रोजी निधन झाले. मराठी सारस्वतातील एका प्रतिभासंपन्न कलावंताचा अंत झाला.

**निष्कर्ष व समारोप :**

अण्णा भाऊ साठे समग्र साहित्य अनुभवाच्या मुसोतून तयार झाले आहे. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, गीत, शाहिरी, लोकनाट्य, चित्रपटकथा अशा विविध साहित्यप्रकारात लेखन करणारे साहित्यिक म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागतो. विषमतायुक्त समाज, गोर-गरीब, दीन-दलित अशा बहुजन वर्गाचे कैवारी, त्यांचे दुःख म्हणजेच उपेक्षितांचे अंतरंग खऱ्या अर्थाने आपल्या लेखणीद्वारे चित्रित केले. महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे,



Scanned with OKEN Scanner

ISBN : 978-81-939613-2-2

मानवी कल्याणाचे ते अनुयायी ठरतात. विश्व मानवतावादी दृष्टीकोन त्यांच्या सर्वच कलाकृतीतून व्यक्त होतो. पारंपारिक विचार, श्रद्धा, समजुतींना फाटा देऊन नवविचार प्रबोधनात्मक मूल्यांचा उद्घोष, मार्क्सवादी विचारसरणीचा आम्ही पुरस्कार व मानवतावादी बहुजनहिताय बहुजनसुखाय संकल्पना त्यांच्या साहित्यातून आलेली दिसते. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक जलशांनी जे कार्य वैचारिक जाणीवांच्या माध्यमातून घडवून आणली, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंबेडकरी विचारधारेने २० व्या शतकात सामाजिक चळवळीच्या माध्यमातून केले तेच चळवळीचे कार्य अण्णाभाऊंच्या लोकनाट्यांनी केले आहे. औपचारिक शिक्षणाची कुठलीही पूर्वपरंपरा नसताना उपेक्षित समाजस्तरात जन्म घेऊन स्वयंप्रेरणेने स्वतःस घडविणाऱ्या व सर्वप्रकारच्या जीवन संघर्षास तोंड देत साहित्य क्षेत्रात आपली नाममुद्रा उमटविणारे लक्षणीय चिंतनशील साहित्यिक म्हणून अण्णा भाऊ साठे यांचा उल्लेख करावा लागतो.

**संदर्भ :**

१. समाधान तुकाराम वाणी (संपा.), सत्यशोधक दर्पण, विशेषांक-२०१८, सिडको औरंगाबाद.
२. डॉ. जनार्धन वाघमारे, विचारशलाका, प्रकाशक नागोराव कुंभार, साठे विशेषांक, डिसेंबर १९९२.
३. भंडारे डी. बी., साहित्यिक अण्णाभाऊ साठे, नंदिग्राम मासिक, जि. प. प्रकाशन नांदेड, १९९३
४. डॉ. शिवाजी जवळगेकर (संपा.), जननायक अण्णाभाऊ साठे, २००७, साहित्यभूषण अण्णा भाऊ साठे कला अकादमी व संशोधन केंद्र लातूर.



ISBN : 978-81-939613-2-2

# सांख्य तत्वज्ञान (सत्ताशास्त्रीय दृष्टीकोन)

डॉ. आंबटकर वृषाली ओंकार
श्री गुरुबुध्दि स्वामी महाविद्यालय, पूर्णा

**प्रस्तावना :–**

व्यक्तीची खरी ओळख ज्याने होते ते ज्ञान होय. अंतीम सत्य अंतीम तत्व या सर्वाचा अभ्यास तत्वज्ञानाच्या क्षेत्रात केला जातो. तत्व अंतीम आदम जे ते तत्व या जिज्ञासूपक मनुष्याचे वैशिष्टय आहे. याच आधारावर तो अनेक प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न करत असतो. जिज्ञासू वृत्तीमुळे मनुष्याला सातत्याने काही प्रश्न उद्‌भवत असतात. यामध्ये मनुष्याला विश्वअस्तित्वाच्या अनुशंगाने प्रश्न पडतात. आणि या सारख्या प्रश्नांची उकल केवळ तत्वज्ञानाच्या क्षेत्रात करण्याचा प्रयत्न केला जातो. हा प्रयत्न तत्वज्ञानाच्या त्या भागात केला जातो त्याला सत्ताशास्त्र असे म्हणतात.

अभ्यासाच्या सोयीकरीता तत्वज्ञानाची दोन विभागात विभागणी केली आहे. ती म्हणजे भारतीय पाश्चात्य दर्शन अशी होय. संपूर्ण तत्वज्ञानाचे अंतीम उद्दीष्ट हे आहे कि अंतीम तत्वांचा किंवा आदय तत्वांचा शोध घेणे होय. या मध्ये भारतीय तत्वज्ञानाचा देखील समावेश होतो. सांख्य तत्वज्ञानाने आपल्या सत्ताशास्त्रीय सिध्दांताच्या आधारावर संपूर्ण तत्वज्ञानाची उभारणी केली आहे.

**भारतीय तत्वज्ञाने :–**

अस्तीक तत्वज्ञान :–यामध्ये प्रदर्शनाचा समावेश होतो जे तत्वज्ञान वेदांचे प्रामाण्य व इश्वराचे अस्तीत्व मानले ते अस्तीक दर्शन होय.

नास्तीक दर्शन :– ज्यांना वेदत्व प्रमाण्य मान्य ते नास्तीक होय. यात केवळ तीन दर्शनांचा समावेश होतो. ते म्हणजे बौध्द , पार्वीक, जैन हे होय.

**गृहितके**

1 भारतीय तत्वज्ञानातील षडतत्वज्ञानात सांख्य तत्वंज्ञान आहे.
2 सांख्य तत्वज्ञानाने विश्वाच्या बुडाशी असणाऱ्या आदय तत्वांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.